जनसंपर्क कक्ष
25 OCT 2021 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवांना गांधी विचारांशी जोडावे लागणार

## अरुण खोरे : गांधी अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महात्मा गांधीजींच्या संदर्भात कार्य करणाऱ्या सेवा संस्था, संघटनांची जबाबदारी सध्या वाढली आहे. त्यांना गांधीजींच्या मार्गानेच गांधी विचारांचे विद्रुपीकरण थांबविण्याची जबाबदारी घ्यावी लागेल. नव्या पिढीला खऱ्या गांधी विचारांशी जोडण्याची जबाबदारी घ्यावी लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व गांधी विचारांचे अभ्यासक अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रामार्फत 'डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला-२०२१'अंतर्गत आयोजित 'गांधींच्या पुनःस्मरणाची गरज का?' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.

### नव्याने ओळख



महात्मा गांधी यांच्या विचारांचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी गांधी विचारांचे सैद्धांतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर प्रसारण करावे लागेल. नव्या पिढीला गांधीजींच्या चैतन्यदायी विचारांची नव्याने ओळख करून द्यावी लागेल, असे अरुण खोरे यांनी सांगितले.

महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यासह सामाजिक योगदान अतुलनीय स्वरुपाचे आहे. त्याची दखल जगभरातील देशांनी घेतली आहे. अलीकडे गांधी विचार पुसून टाकत त्यांची प्रतिमा संकुचित करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. त्यासाठी तज्ज्ञ अभ्यासकांची मदत घेतली जात आहे, हे चिंताजनक असल्याचे अरूण खोरे यांनी सांगितले. हत्या, हिंसा, द्वेष अथवा सूडभावना या मानवजातीच्या विरुद्ध आहेत. त्यांचे समर्थन करणे चुकीचे आहे. निरामय समाजनिर्मितीसाठी गांधी यांच्या सद्विचारांचे अनुसरण करणे आवश्यक असल्याचे डॉ. अशोक चौसाळकर यांनी सांगितले. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी रामदास भटकळ, दशरथ पारेकर, नागोराव कुंभार, अरुण भोसले, नंदा पारेकर, विवेक कोरडे, चंद्रकांत लंगरे, किशोर बेडकिहाळ उपस्थित होते.

25 OCT 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फॉईल सांघिकच्या दोन्ही गटांत कोल्हापूरला सुवर्ण

## ईपी पुरुष गटात प्रथमकुमार शिंदे अजिंक्य; पुरुष गटात औरंगाबाद, तर महिला गटात पालघरला रौप्य

**कोल्हापूर, ता. २४ :** ३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत दुसरा दिवस कोल्हापूरच्या स्पर्धकांनी गाजवला. फॉईल प्रकारामध्ये महिला आणि पुरुष गटाने सुवर्णपदक पटकावले. पुरुष गटात औरंगाबाद तर महिला गटात पालघर संघाने रौप्य तर नाशिक व नांदेड पुरुष संघाने आणि महिला गटात मुंबई व मुंबई उपनगर या संघाना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

ईपी वैयक्तिक प्रकारात कोल्हापूरचा खेळाडू प्रथमकुमार शिंदे याने तर महिला गटात लातूरच्या माही आरदवाड यांनी सुवर्ण पदकावर नाव कोरले. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशनतर्फे आयोजित स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सुरु आहे.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी फॉईल सांघिक फेन्सिंग खेळ प्रकारात अंतिम सामना कोल्हापूर विरुद्ध औरंगाबाद या दोन संघात खेळला गेला. या सामन्यांमध्ये कोल्हापूर संघाने पंधरा गुण मिळवत सुवर्णपदक तर औरंगाबाद संघाला दहा गुण मिळाल्याने रौप्य पदकवरच समाधान मानावे लागले. वरिष्ठ गट मुलींच्या स्पर्धेत कोल्हापूर विरुद्ध पालघर असा सामना खेळला गेला या सामन्यात पालघर संघाला निसटत्या परभवाला सामोरे जावे लागले. पालघर संघाला १३ गुण मिळाले तर १५ गुण मिळवून कोल्हापूर संघाने सुवर्ण पदक पटकावले. कोल्हापूरच्या संघात ज्योती सुतार, अंकिता सोळुंके, सई पवार, अमृता तराळ तर पालघरच्या पौर्णिमा राजूस्वामी, वैष्णवी कासार, अनुजा लाड, सानिका भवर या खेळाडूचा समावेश होता.



कोल्हापूर : सुवर्णपदक विजयी कोल्हापूर जिल्हा संघासह संघटनेचे पदाधिकारी आणि मान्यवर.

### आज बक्षीस वितरण

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ भारतीय तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष तथा राज्य संघटनेचे अध्यक्ष पालकमंत्री सतेज पाटील, संघटनेचे पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत संध्याकाळी ५ वाजता होणार आहे.

### स्पर्धा सर्वांसाठी खुली

हि स्पर्धा प्रेक्षकांसाठी खुली असून स्पर्धा पाहण्यासाठी विशेष बैठकव्यवस्थेची सोय करण्यात आली आहे.

### ईपी वैयक्तिक मध्येही कोल्हापूरला सुवर्ण

ईपी प्रकारात पुरुष गटात कोल्हापूरच्या प्रथमकुमार शिंदे याने तर महिला गटात लातूरच्या माही आरदवाड हिने सुवर्णपदक पटकावले. प्रथमकुमार शिंदे आणि सांगलीच्या गिरीश जकाते यांच्यात रंगलेल्या अटितटीच्या सामन्यात शिंदे याने ९ गुण मिळवून गोल्ड मेडल पटकावले तर जकाते याला ८ गुणासह रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. मुलींचा अंतिम सामन्यात लातूरच्या माही आरदवाड हिने नम्रता यादव हिला पराभूत करत सुवर्णपदक मिळवले. या स्पर्धेत आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट धर्मेंद्र सिंग.उदयपाल सिंग.मंदीप सिंग.राकेश रॉय यांच्यासह महाराष्ट्रातील पंचानी काम पाहिले.

लोकमत

# 'तलवारबाजी'मध्ये दुसऱ्या दिवशी कोल्हापूरची बाजी

## फॉईल सांघिक दोन्ही गटांत 'सुवर्ण'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बत्तीसाव्या राज्य फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी कोल्हापूर संघाच्या पुरुष व मुलींच्या संघाने फॉईल प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले, तर पुरुषगटात औरंगाबाद संघाने, तर महिला गटात पालघर संघाने रौप्य आणि महिला गटात मुंबई व मुंबई उपनगर संघांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरू असलेल्या या स्पर्धेत कोल्हापूरचा स्टार खेळाडू प्रथमकुमार शिंदे याने, तर महिलांमध्ये लातूरच्या माही आरदवाड हिने सुवर्णपदक पटकाविले. फॉईल प्रकारात झालेल्या कोल्हापूर विरुद्ध औरंगाबाद यांच्यातील अंतिम सामन्यात कोल्हापूर संघाने १५ गुण मिळवत सुवर्ण, तर दहा गुण मिळवून औरंगाबाद संघास रौप्य आणि नाशिक व नांदेड या दोन संघांना संयुक्तरित्या कांस्य पदकावर समाधान मानावे लागले. पुरुषांमध्ये कोल्हापूरच्या विपुल येडेकर, अनिल मठपती, योगेश काळे, श्रावण काटकर, तर औरंगाबादच्या तुषार आहेर, शाकीर सय्यद, प्रितम देशमुख , तेजस पाटील यांनी लक्षवेधी खेळ करीत उपस्थितांकडून वाहवा मिळवली.

वरिष्ठ गट मुलींमध्ये कोल्हापूर संघाने पालघर संघाचा अटीतटीच्या लढतीत पराभव केला. ईपी प्रकारात कोल्हापूर, लातूर संघाने सुवर्ण पदक पटकाविले. ईपी वैयक्तिक प्रकारात कोल्हापूरच्या प्रथमकुमार शिंदे व सांगलीच्या गिरीश जकाते यांच्यातील सामना अटीतटीचा झाला. शिंदे याने नऊ गुणांसह सुवर्ण तर जकाते याने ८ गुणांसह रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. भंडाऱ्याचा निखील कोवाड व सांगलीचा मोरेश्वर पाटील यांनी संयुक्तरित्या कांस्य पदक पटकाविले. मुलींच्या अंतिम सामन्यांत लातूरच्या माही आरदवाड हिने नम्रता यादव हिला पराभूत करीत सुवर्ण पदक पटकाविले. लातूरच्या ज्ञानेश्वरी शिंदे व पालघरच्या वामा मानियार या दोघींना कांस्य पदक वाटप करण्यात आले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरु असलेल्या राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेतील रविवारी सकाळी झालेल्या एका सामन्यांतील एक क्षण

जनसंपर्क कक्ष

25 OCT 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षा उद्यापासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी एम.फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षा मंगळवार (दि. २६) पासून सुरू होणार आहे.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), श्रीमत मथुबाई गरवारे कन्यामहाविद्यालय (सांगली) वसातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयात या परीक्षा होणार आहेत. २८ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा चालणार आहे. वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वेळापत्रक पाहून विद्यार्थ्यांनी परीक्षेचे नियोजन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

25 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या पुरुष-महिला संघांना सुवर्णपदक

## ईपी पुरुष गटात प्रथमकुमार शिंदे अजिंक्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या दिवसावर कोल्हापूरचे वर्चस्व राहिले. रविवारी झालेल्या फॉईल सांघिक प्रकारातील अंतिम फेरीत कोल्हापूरच्या पुरुष व महिला संघांनी प्रतिस्पर्धी संघांना नमवत सुवर्णपदकांची कमाई केली. पुरुष गटात औरंगाबाद, तर महिला गटात पालघर संघाने उपविजेतेपद पटकाविले. ईपी वैयक्तिक प्रकारात कोल्हापूरचा स्टार खेळाडू प्रथमकुमार शिंदे याने, तर महिला गटात लातूरच्या माही आरदवाड हिने सुवर्णपदकावर नाव कोरले.



कोल्हापूर : येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेतील चुरशीचा एक क्षण.

**३२ वी राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा**

### बक्षीस समारंभाने आज सांगता

स्पर्धेची सांगता सोमवारी सायंकाळी बक्षीस समारंभाने होणार आहे. पालकमंत्री सतेज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ होणार आहे. स्पर्धा दिवसभर सर्वांसाठी खुली असून क्रीडाप्रेमींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचा राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी फॉईल साघिक फेन्सिंग प्रकारात अंतिम सामना कोल्हापूर विरुद्ध औरंगाबाद संघात झाला.

यात कोल्हापूर संघाने १५ गुण मिळवत सुवर्णपदक, तर औरंगाबाद संघाने १० गुणांसह रौप्य पदक मिळविले. नाशिक व नांदेड संघांना कांस्य पदक विभागून देण्यात आले. कोल्हापूरच्या विपुल येडेकर, अनिल मठपती, योगेश काळे, श्रावण काटकर, तर औरंगाबादच्या तुषार आहेर, शाकीर सय्यद, प्रीतम देशमुख, तेजस पाटील या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ केला.

मुलींच्या गटात कोल्हापूर विरुद्ध पालघर यांच्यात अंतिम सामना झाला. पालघर संघावर १५ - १३ असा विजय मिळवून कोल्हापूरने सुवर्णपदकाची कमाई केली. कोल्हापूरच्या ज्योती सुतार, अंकिता सोळुंके, सई पवार, अमृता तराळ, तर पालघरच्या पौर्णिमा राजुस्वामी, वैष्णवी कासार, अनुजा लाड, सानिका भवर यांनी उत्कृष्ट खेळ केला.

**लातूरला सुवर्ण**

ईपी प्रकारात पुरुष गटात कोल्हापूरच्या प्रथमकुमार शिंदे याने, तर महिला गटात लातूरच्या माही आरदवाडनं सुवर्णपदक पटकावले. प्रथमेशने सांगलीच्या गिरीष जकातेचा ९-८ असा पराभव केला. भंडाऱ्याचा निखिल कोवाड व सांगलीचा मोरेश्वर पाटील यांना कांस्य पदक विभागून देण्यात आले. मुलींच्या अंतिम सामन्यात लातूरच्या माही आरदवाड हिने नम्रता यादव (पालघर) हिला पराभूत केले. लातूरच्या ज्ञानेश्वरी शिंदे व पालघरच्या वामा मनियार यांना कांस्य पदक विभागून देण्यात आले. बक्षीस समारंभ शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या उमा भोसले यांच्या हस्ते झाला.




कोल्हापूर : फॉईल गटात अजिंक्यपदासह सुवर्णपदक पटकाविणारा कोल्हापूरचा संघ. सोबत मान्यवर.
(छाया : पप्पू अत्तार)

25 OCT 2021 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया दोन दिवसात

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय : कोरोनाचे दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थांना प्रवेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग सुरू झाले असले तरी राहण्याची, जेवणाची सोय नसल्याने विद्यार्थी मात्र गैरहजर आहेत. विद्यार्थी हित लक्षात घेता येत्या दोन दिवसात वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ होणार आहे. दिवाळीनंतर प्रत्यक्षात वसतिगृह सुरू झाल्यानंतरच वर्गसुध्दा गजबजणार आहे.

वसतिगृहांच्या प्रवेशाचे नियोजन करण्यापुर्वीच शासनाने विद्यापीठ अधिविभाग सुरू करण्याचे आदेश दिले. अधिविभाग सुरू केले परंतू



परगावच्या विद्यार्थ्यांनी मात्र राहण्याचे कारण पुढे करीत अधिविभागाला दांडी मारली. त्यामुळे वसतिगृह सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने बैठक घेवून नियोजन केले आहे. कोरोनाचे दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार वसतिगृह सुरू केली जातील. ज्या विद्यार्थ्यांनी कोरोना लसीकरण पूर्ण केलेले नाही, त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला माहिती द्यावी. शिबिराच्या माध्यमातून त्यांचे लसीकरण विद्यापीठाकडून पूर्ण करून घेतले जाईल. वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली तरी दिवाळीनंतरच वसतिगृहात राहता येणार आहे. वसतिगृह सुरू करण्यासंदर्भात खानावळीची निवीदा प्रसिध्द केली आहे. वसतिगृहातील लाईट,गिझर दुरूस्ती व खोल्यांची स्वच्छता, सॅनिटायझेशन करण्याचे काम सुरू आहे.

**विद्यार्थी संख्येनुसार वसतिगृहाचे नियोजन**

वसतिगृहातील एका खोलीत तीन अशी विद्यार्थी क्षमता आहे. किती विद्यार्थी वसतिगृहात प्रवेश घेतात. हे पाहून कोरोना नियमांचे पालन करीत एका खोलीत किती विद्यार्थी ठेवायचे याचा निर्णय घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांना कोणती व्याधी असेल तर त्यांनी विद्यापीठातील हेल्थ सेंटरला जावून तपासणी करावी. तसेच वसतिगृह प्रवेशासाठी कोरोनाचे दोन डोस पूर्ण करावे.

**डॉ. विलास नांदवडेकर (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)**